पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
दिनांक 17/12/2019 (मंगळवार)
(सायंकाळ)

---

## जिवानाशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीतांना विरूद्ध गुन्हा नोंद

पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत 01 कि. मी अंतरावर शिवनगर कन्हान येथे दिनांक 16/12/2019 चे 20.00 वा. ते 20.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– सिध्दार्थ संतोष पगारे, वय 49 वर्ष, रा. शिवनगर कन्हान यांचा पुतण्या नामे– केतन पगारे, वय 15 वर्ष हा शिवनगर कन्हान येथे टयुशन क्लासला जात होता. दरम्यान विधी संघर्षग्रस्त बालक क्र. 1 यांने केतनच्या अंगावर पानी का टाकले, या कारणावरून विधी संघर्षग्रस्त बालक क्र. 1 याने वाद घालुन, ''तु रूक तुझे बताता हुँ,'' अशी धमकी दिली. यानंतर केतन पगारे हा टयुशन संपवुन, येत असतांना विधी संघर्षग्रस्त बालक क्र. 1, 2 व 3 यांनी केतन यास अडवुन, त्याच्या सोबत वाद घालुन आ.क्र. 2 व 3 यांनी त्यांचे जवळील चाकुने जिव घेण्याच्या उद्देशाने फिर्यादीच्या पोटावर, मांडीवर, व हातावर मारहाण करून जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कन्हान येथे विधी संघर्षग्रस्त बालकांविरुध्द कलम 307, 34 भादंवि. सहकलम 3(2) व्ही अजाजअप्रका सहकलम 4, 25 आर्म ॲक्ट अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास उपविभागीय पोलिस अधिकारी श्री. पुजल्वार हे करीत आहे.

## पाण्यात बुडुन मृत्यु

पो. स्टे. नरखेड : – अंतर्गत 20 कि.मी. अंतरावर मौजा खापरी गेसावी शिवार येथे दिनांक 15/12/2019 चे 16.00 वा. दरम्यान यश कपील गिरी, वय 14 वर्ष, रा. उमरी हा खापरी शिवारातील तलावात पोहण्याकरीता गेला होता. दरम्यान पोहतांना यश गिरी खोल पाण्यात गेल्याने पाण्यात बुडुन त्याचा मृत्यू झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– क्पील सुरेश गिरी, वय 35 वर्षे, रा. उमरी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. नरखेड येथे कलम 174 जाफौ. अन्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलीस नाईक किशोर धवड हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर